# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) (द्वारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**( परीक्षा व मुल्यमापन मंडळ)**

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२२३१०४ E-mail Id – coegondwana@gmail.com

जा.क्र./गों.वि./परीक्षा विभाग/३८१४ /२०१९ दि. १८/१०/२०१९

## अधिसुचना

### हिवाळी–२०१९ परिक्षेकरीता आवश्यक सुचना

१) सर्व परीक्षा केंद्राधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, हिवाळी–२०१९ च्या परीक्षा दिनांक ३०/१०/२०१९ पासुन सुरू होत आहे सदर परीक्षेकरीता लागणारे आवश्यक दस्ताऐवज (Roll List, Invigilator Diary, Numerical Report, Paper Wise Attendance Sheet & Junior Supervisor Report) व परीक्षे संबंधीत माहीती ही www.unigug.ac.in https:/gondwanauniv.emdoar.com या विद्यापीठाचे संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. करीता महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयांच्या Login Id वर ही माहीती तपासुन घ्यावी याबाबत काही त्रृटी असल्यास खास दुता मार्फत विद्यापीठात लेखी कळवावे. परीक्षेचे प्रवेशपत्र महाविद्यालयाच्या Login ID वर निर्गमित करण्यात आलेले आहेत करीता नोंद घ्यावी.

२) ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क भरून परीक्षा आवेदन पत्र विद्यापीठात सादर केलेले आहे. अशाच विद्यार्थ्यांना परीक्षा प्रवेश पत्र ( Hall Ticket ) वितरीत करण्यात यावे. ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्र व शुल्क विद्यापीठात सादर केले नाही अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेशपत्र Hall Ticket प्राचार्यांनी प्रमाणित करून वितरीत करू नये वितरीत केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्याची राहील, याची नोंद घ्यावी.

३) विद्यार्थ्यांच्या परीक्षा प्रवेश पत्रा Hall Ticket वर काही त्रृटी ( नाव, विषय, कोर्स, माध्यम व परीक्षा केंद्र किंवा इतर त्रृटी ) असल्यास त्रृटी दुरूस्ती करण्याकरीता त्यांच्या पुराव्यासह संबंधीत लिपीकाने सहा. कुलसचिव (परीक्षा पुर्व) यांना विशेष दुतामार्फत संबंधित परिक्षेच्या ३ दिवस आधी कळवुन त्यांची लेखी पोच घ्यावी. परस्पर विद्यार्थ्यांना विद्यापीठात पाठवू नये.

४) अभ्यासक्रमामध्ये विद्यापीठाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांचे प्रवेश झालेले नसल्यास तसेच विद्यापीठाच्या नियमानुसार परीक्षा आवेदनपत्र भरलेले नसताना सुध्दा त्या विद्यार्थ्यांचे ( Hall Ticket )विद्यापीठाद्वारे निर्गमित झाले असल्यास सदर प्रवेशपत्र विद्यार्थ्यांना देण्यात येवू नये सदर विद्यार्थ्यांचे (Hall Ticket ) रद्द करण्याकरीता सहा. कुलसचिव ( परीक्षा पूर्व) यांना विशेष दुतामार्फत कळविण्यात यावे.

५) मागील परीक्षेमध्ये असे निदर्शनास आले आहे की, परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांचे विषय बदल, माध्यम बदल व इतर बाबीमध्ये बदल करून विद्यार्थ्यांकडून Undertaking घेऊन त्यांना परीक्षेला बसवितात. या परीपत्रकाद्वारे सर्व परीक्षा केंद्राधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, वेळेवर कोणतेही विद्यार्थ्यांचे विषय /माध्यम बदल व इतर बाबीमध्ये बदल करू नये व Undertaking घेऊन परीक्षेला बसवू नये. तसे केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत केंद्राधिकारी यांची राहील. या बाबतीत परीक्षा विभागाशी संपर्क साधूनच आवश्यक कार्यवाही करावी.

६) परीक्षेमधील गैरप्रकाराचा ( UF ) उत्तरपत्रिका संबंधित पुराव्यासह व आवश्यक दस्ताऐवजासह स्वतंत्र बंडल मध्ये विद्यापीठात पाठविण्यात यावे. बंडल वर ठळक अक्षरात विद्यार्थ्यांचा बैठक क्रमांक नमुद करावा. सदरचे सर्व प्रपत्र विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

७) परीक्षा केंद्रावर उत्तरपत्रिका व इतर परीक्षे संबंधीत आवश्यक साहीत्य या बाबत सेंटर रिपोर्ट प्रमाणे शहानिशा करून काही अडचणी असल्यास परीक्षेच्या दोन दिवस पुर्वी विद्यापीठात संपर्क साधावा.

८) विद्यार्थ्यांनी प्रवेश पत्रावर दिलेल्या सर्व सुचनांचे तंतोतंत पालन करने आवश्यक आहे आणि परीक्षेकरीता विद्यार्थ्यांनी पेपर सोडवितांना काळया शाईचे / निळया शाईचे (कोणतेही एकच) बॉल पेन वापरावे.

९) या परीक्षेकरीता उत्तर पत्रिकेत बैठक क्रमांक चे एकुण दहा रकाने देण्यात आले असून विद्यार्थ्यांनी आपला बैठक क्रमांक ( **Roll No.** ) उत्तरपत्रिकेत स्लीप–१ व स्लीप–३ मध्येही लिहावा आणि पर्यवेक्षक तथा केंद्राधिकारी यांनी परीक्षार्थ्यांनी लिहीलेला रोल नंबर बरोबर असल्याची खात्री करूनच स्वाक्षरी करने बंधनकारक आहे

१०) सर्व विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर जातांना सोबत ओळखपत्र जवळ ठेवणे गरजेचे आहे तशा सुचना महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना दयाव्यात.

११) परिक्षेदरम्यान विद्यापीठाद्वारे निर्गमित होणाऱ्या सूचनांचे प्रसारण/प्रकाशन करून संबंधीत माहीती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याची महाविद्यालय प्रशासनाची जवाबदारी राहील.

१२) सर्वच परीक्षा केंद्रावर **Secured Online Question Paper Delivery** करण्यात येत आहे. त्यामुळे इंटरनेट, मोबाईल, सेवा अखंडीत सुरू राहाव्या तसेच विद्युत पुरवठा अखंडीत सुरू राहावा, परीक्षा केंद्रावर सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीने स्थानिक संबंधीत विभाग प्रमुखांना लेखी सुचना प्राचार्यांनी देऊन सेवा उपलब्धतेबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

१३) **Online Question Paper Delivery to Examination Center** करीता विद्यापीठात निर्देश क्रं. १८८/२०१६ निर्गमित केलेले आहे. त्यानुसार प्रत्येक परीक्षा केंद्रावर परीक्षा पार पाडणे प्राचार्यांची जबाबदारी आहे.

१४) परीक्षे दरम्यान परीक्षा केंद्राधिकारी/सह परीक्षा केंदाधिकारी यांनी प्रश्नपत्रिका वितरीत करीत असतांना विद्यार्थ्यांच्या प्रवेश पत्र **(Hall Ticket)** वर जे माध्यम देण्यात आलेले असेल त्या माध्यमाची प्रश्नपत्रिका विद्यार्थ्याला प्राप्त झाली कि नाही याची शहानिशा करावी अन्यथा सर्वस्वी जबाबदारी परीक्षा केद्राधिकाऱ्यांची राहील यांची नोंद घ्यावी.

१५) परीक्षेला बसलेले दिव्यांग विद्यार्थ्यासंबंधी मा. शिक्षण संचालनालय, उ. शिक्षण, पुणे क्रमांक युएनआय–२०१८/दिविसो/(१९५/१८)/विशी/१९३०६ दिनांक २८ नोव्हेंबर २०१८ नुसार कार्यवाही करावी व काही अडचण निर्माण झाल्यास विद्यापीठाशी संपर्क साधावा.

१६) परीक्षेच्या काळात परीक्षा विभागाव्दारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सुचनांचे पालन करावे.

१७) परिक्षा केंद्रावर उपलब्ध झालेल्या उत्तरपत्रिकेचा वापर उत्तर पत्रिकेच्या अनुक्रमांकानुसार क्रमशः करावा.

१८) परिक्षा केंद्रावरिल परिक्षेसंबंधी दस्ताऐवज (पर्यवेशक डायरी, उपस्थिती शीट, ई. परिक्षा संपल्यानंतर विद्यापीठात तात्काळ जमा करणे अनिवार्य आहे.

१९) कोऱ्या उत्तर पत्रिकेच्या बाबतीत श्री सत्यम नरगडे (उच्च श्रेणी लिपीक) यांचे सोबत (मो. न ९२२६५९९६७०) संपर्क साधावा

२०) परिक्षे संबंधीत माहिती विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावरिल **www.unigug.ac.in** ग्राहय धरण्यात यावेत व वेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या सुचना आपल्या सुचना फलकावर प्रकाशित करून परिक्षार्थ्यांना माहिती द्यावी.

२१) परीक्षेसंबंधी आलेल्या अडचणीबाबत संबंधितांच्या भ्रमणध्वनीचे **(Help line)** क्रमांक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आलेले आहे त्यानुसार कार्यवाही करावी.

२२) लेखी परीक्षा संपल्यानतंर दहा दिवसाचे आत परीक्षेचा संपुर्ण हिशोब विद्यापीठाकडे सादर करावा अन्यथा लेखा विभागाकडून बिले न स्विकारल्यास होणाऱ्या आर्थिक नुकसानीस आपण जबाबदार राहील.

विद्यापीठाद्वारे परीक्षा सुरळीत घेण्याच्या दृष्टीने सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन होणे आवश्यक असुन परीक्षेत होणाऱ्या चुका तसेच विद्यार्थ्याचा मानसिक ताण वाचू शकेल याबाबत सर्व प्राचार्य व केंद्राधिकाऱ्यांनी सहकार्य करावे.

18/01/2019

(डॉ. अनिल झेड. चिताडे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

संपर्क करीता दुरध्वनी:–
परीक्षा (पुर्व) :– ०७१३२–२२३३२०, ७७७४०५९३३५, ७७७४०२७६६७
परीक्षा प्रवेश पत्र **Online** उपलब्ध नसल्यास संपर्क
संगणक विभाग :– ०७१३२–२२३१०८, ९६५७५७७१३८,८८३०६२३७८५